# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 246/2023  दिनांक : 25.06.2023

## 1)जबरी चोरी :–

**विमानतळ** :– दिनांक 22.06.2023 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **शंकरराव चव्हाण चौक मार्ग आसना टी पॉईंट सांगवी येथील दत्ता कोकाटे यांचे शिवसेना कार्यालयाचे बाजुस असलेल्या कॉपीशॉप समोर रोडवर नांदेड येथे,** यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे मोटार सायकल समोरून मो सा आडवी लावुन फिर्यादीच्या मो सायकलची चावी काढुन घेवुन मारहाण केली. व जबरीने खिशातील 3,300/–रूपये काढुन घेवुन दगड मारून मो सा चे डोम फोडुन अंदाजे 1000/–रूपयाचे नुकसान केले. व तु जर आमचे विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिलास तर तुला खतम करतो म्हणुन धमकी देवुन निघुन गेले. वगैरे **फिर्यादी शहादत ऊर्फ शाहदत महाराज पि. आनंदराव नालापल्ले, वय 23 वर्षे, व्यवसाय दत्त संस्थान मठाधिपती सरेगाव मुळ रा. बोरगाव थडी पोस्ट आळंदी ता. बिलोली ह. मु. सरेगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 214/2023 कलम 394, 427, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गोंड, मो.क्रं. 7972567042** हे करीत आहेत.

## 2)गोदामातील चोरी :–

**1)उमरी** :– दिनांक 23.06.2023 रोजी चे 16.00 ते दि. 24.06.2023 चे 11.00 वा. चे दरम्यान, **तालुका कृषी अधिकारी यांचे गोदामात एरीकेशन कॉलनी उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे तालुका कृषी अधिकारी गोदामा मधील आत्मा योजनेतील आलेले बियाणे कोणीतरी अज्ञात चोरटयाने गोदामाचे कुलूप तोडुन आत मध्ये प्रवेश करून अंदाजे किंमती 45,000/–रूपयाचे बियाणे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी राजेंद्रकुमार हरी सोनसळे, वय 50 वर्षे, व्यवसाय कनिष्ठ लिपीक ता. कृषी अधिकारी उमरी रा. घुंगराळा ता. नायगांव ह. मु. जेतवननगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 177/2023 कलम 461, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम मो. क्रं. 9623658510** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**मुखेड** :– फिर्यादीचे लग्न झाल्यापासुन दोन ते तीन महिन्यानंतर **व** दिनांक 18.06.2023 रोजी चे 12.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे माहेरी मंग्याळ ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन मोटार सायकल घेण्यासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 194/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री राठोड, मो.क्रं. 9075991193** हे करीत आहेत.

## 4)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**1)विमानतळ** :–दिनांक 24.06.2023 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **आसना चौक नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून आपले ताब्यातील टाटा मॅजीक वाहन क्रमांक 1)एमएच–26/एडी–5393, मध्ये दोन बैल गोरे, 2)एमएच–38/एक्स–1913 मध्ये तीन बैल गोरे, असे एकुण किंमती 6,92,000/–रू चे मुद्देमालासह जनावरे दाटीवाटी कोंबुन बिना परवाना बेकायदेशिरीत्या निर्दयतेने व क्रुरतेने बांधुन कतली करीता घेवुन जात असतांना मुदेमलासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री रवि यादवराव बुरकूले, ने. पोस्टे विमानतळ** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ गुरन 215/2023** कलम 5(ए), 5(ब), 9 महाराष्ट्र प्राणि संरक्षण कायदा सह कलम 3, 11)(ड)(ई)(फ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम 1960 सह कलम 66/192 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2735 व्हि के खंदारे, मो. नं. 8551059899** हे करीत आहेत.

**2)देगलुर** :–दिनांक 24.06.2023 रोजी चे 09.40 वा. चे सुमारास, **मौ. शेळगाव येथील बसस्थानक ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून आपले ताब्यातील वाहन अशोक लिलॅड कंपणीचे पिकअप क्रमांक टिएस–12/येडी–8494 या वाहानांत गोवंश जातीचे पाच जनावरे (गोरे) दाटीवाटी कोंबुन बिना परवाना बेकायदेशिरीत्या निर्दयतेने व क्रुरतेने बांधुन कतली करीता घेवुन जात असतांना मुदेमलासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री रवि केरबाजी मुंडे, ने. पोस्टे देगलुर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर गुरन 308/2023** कलम 279, 34 भादवि सह कलम 11)(ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम 1960 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1984 सकनुरे, मो. नं. 9821159844** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)किनवट** :– दिनांक 22.06.2023 रोजी चे 16.20 वा. चे सुमारास, **दिगडी मंगाबोडी शेत शिवारामध्ये मोकळया जागेवर ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 2190/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3209, सदाशिव माणिकराव आनंदवार, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 162/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2190 श्रीमनवार, मो.क्रं. 9527177881** हे करीत आहेत.

**2)बिलोली** :– दिनांक 24.06.2023 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **मांजरा नंदीच्या कडेला कारला शिवारात शेताच्या धुऱ्यावर मोकळया जागेत बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे**, यातील नमुद आठ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 6,70,030/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2351, मारोती सायलु मुदेमवार, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 97/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मळाळे, मो.क्रं. 9518799390** हे करीत आहेत.

**3)लोहा** :– दिनांक 24.06.2023 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **शिवाजी चौक लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 4,880/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2554, आनंद उकंडजी भाडेकर, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 155/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2427 लाडेकर, मो.क्रं. 9423305906** हे करीत आहेत.

**4)लोहा** :– दिनांक 24.06.2023 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **शिवाजी चौक लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 1200/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/112, शिवराज कंठीराम कदम, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 154/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2554 भाडेकर, मो.क्रं. 8888865854** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड